# उठून बाहेर आले, ब्रह्मास्त्र सोडले आघाडीत बिघाडी? नेते बिथरले

## आंबेडकर म्हणाले, इंडियाचे अस्तित्व संपले-ताक फुंकून प्यावे लागेल

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक शुक्रवारी मुंबईत झाली. आघाडी सोबत घरोबा करण्याबाबत वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक प्रकाश आंबेडकर यांचा निर्णय होणार होता. ते या बैठकीत सहभागी झाले पण मध्येच मला जायचे म्हणून ते मधूनच उठून बाहेर आले.बाहेर येताच त्यांनी ब्रह्मास्त्रच सोडले. मी महाविकास आघाडीसोबत नाही. केवळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेसोबत आहे. काँग्रेससोबत सध्या चर्चा सुरु आहे, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय पातळीवरची इंडिया आता संपलेली आहे तेव्हा राज्यात महाविकास आघाडीचे तसे होवू द्यायचे नाहीय, अशी माझी प्रामाणिक भूमिका असल्याचेही ते म्हणाले. दूध पोळल्यावर ताक फुंकून प्यावे लागते, असे म्हणतात. त्यानुसार आपली आगामी भूमिका असेल, असे विधान केल्याने त्यांचा काँग्रेसवरील राग अजूनही गेल्याचे दिसत नाही.विशेष म्हणजे इंडियामध्ये सहभागी असणारे ठाकरे यांचे विश्वासू संजय राऊत यांच्या समोरच आंबेडकरांनी हा बॉम्ब टाकल्याने आघाडीत बिघाडी होणार की काय? अशी चर्चा मात्र रंगली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




कालचा विरोधक, आजचा मित्र!

| कल्याण |
|---|
| 334-04-149 |

| मुंबई |
|---|
| 160-72-129 |

महाविकास आघाडीच्या बैठकीला वंचित आघाडीचे प्रमुख आंबेडकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या बैठकीनंतर माध्यमाशी बोलताना ते म्हणाले, वंचित आघाडी अद्यापही महाविकास आघाडीचा भाग नाही. आम्ही केवळ राष्ट्रवादी आणि शिवसेनेसोबत आहेत. पुढील आठवड्यात काँग्रेसचे वरिष्ठ नेते येणार आहेत, त्यानंतर पुढील बोलणी होणार आहे.

महाविकास आघाडीची बैठक अजून चालू आहे. मला बाहेर जायचे आहे; म्हणून मी निघालो आहे. जे मुद्दे मी बैठकीत ठेवले होते, त्या मुद्द्यांच्या संदर्भात तीनही पक्ष अंतर्गत चर्चा करत आहेत. या मुद्द्यांमध्ये आणखीन काही मुद्दे ॲड करायचेत का, ते केले जातील आणि नंतर एक ड्राफ्ट तयार होईल. इतर मुद्द्यावरील चर्चा ही कंटिन्यू राहील. मला काही कामानिमित्त बाहेर जायचे आहे, त्यामुळे मी निघालो आहे, असेही आंबेडकरांनी स्पष्ट केले.

आंबेडकर म्हणाले, महाविकास आघाडीची इंडिया होऊ नये, याची आम्ही दक्षता घेत आहोत. ताक जरी असले तरी फुंकून पित आहोत. जागावाटपाचा मुद्दा पुढच्या बैठकीत असेल. आजच्या बैठकीमध्ये किमान समान कार्यक्रमाबद्दल चर्चा झाली आहे.इंडिया आघाडी आता काही शिल्लक राहिलेली नाही. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव आणि काँग्रेस हे लास्ट पार्टनर राहिले होते. माझ्या माहितीप्रमाणे ते दोघेही वेगळे झालेले आहेत. काँग्रेस वेगळी जात आहे. शरद पवार गटसुद्धा वेगळा जात आहे, त्यामुळे राज्यात अशी परिस्थिती घडू नये, यासाठी आम्ही दक्षता घेत आहोत, असेही ते म्हणाले.



### बैठकीत काय ठरले ?

या बैठकीत महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला नेमका कसा असेल? भाजपला रोखण्यासाठी रणनीती काय असावी, यावर चर्चा झाली. 'भाजपचा पराभव हीच आमची प्राथमिकता, त्यानंतर जागावाटप', असे राऊतांनी सांगितले. महाविकास आघाडीच्या मागील बैठकीनंतर प्रकाश आंबेडकर यांनी 'कॉमन मिनिमम प्रोग्राम'वर बैठकीत चर्चा व्हावी, अशी मागणी केली होती. त्यानंतर आजच्या बैठकीत 'कॉमन मिनिमम प्रोग्राम'वर चर्चा झाली असल्याची माहिती राऊत यांनी दिली. भाजपचा पराभव हीच आमची प्राथमिकता असून त्यानंतर जागावाटप, असं राऊत म्हणाले.

### अगोदर प्रोग्राम मग जागा वाटप

महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' ठरवण्यात यावा, अशी मागणी आंबेडकर यांनी केली होती. त्यानंतर आज झालेल्या बैठकीत 'कॉमन मिनिमम प्रोग्राम'वर सविस्तर चर्चा करण्यात आली. आता महाविकास आघाडीत 'कॉमन मिनिमम प्रोग्राम'साठी वेगळी समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे राऊतांनी सांगितले. एकदा 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' ठरला की जागावाटपावर चर्चा करणार आहोत, असे आंबेडकर यांनी सांगितले.जागा वाटपाच्या संदर्भात ही बैठक होती परंतु कॉमन प्रोग्रामचा विषय समोर आल्याने तो विषय बाजूला पडला.

### मविआची इंडिया आघाडी होऊ नये

माध्यमांशी बोलताना आंबेडकर यांच्या बाजूलाच संजय राऊत उपस्थित होते. यावेळी आंबेडकरांनी इंडिया आघाडीबाबत खोचक विधान केले. मविआ आघाडीची इंडिया आघाडी होऊ नये हे आमचे या बैठकीत ठरले आहे. आम्ही ही दक्षता घेऊ. जागावाटप हा आमचा पुढच्या टप्प्याचा मुद्दा असेल. पहिल्या टप्प्यात किमान समान कार्यक्रमाचा मुद्दा आम्ही घेतला आहे. त्यावर सध्या निम्मी चर्चा झाली असून निम्मी चर्चा बाकी आहे, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.




